# ई-निविदा सूचना

## जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर (दुसरी वेळ)

जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडून निश्चित करण्यात आलेले शासकीय सर्व्हे नं. मधील क्षेत्र गौण खनिज (मुरुम, माती, गिट्टी, बोल्डर इ.) उत्खनन व वाहतूकीसाठी 5 वर्षाच्या कालावधी करिता खाणपट्टे ई-लिलावाद्वारे मंजुर करावयाचे आहे. त्याकरिता खाणकाम योग्य चिन्हांकीत क्षेत्राचा भूविज्ञानकीय तांत्रिक अहवाल तयार करण्यासाठी खनिज सवलत नियम, 2016 च्या तरतूदीनुसार अनुभवी अर्हताप्राप्त 3 (तिन) भूवैज्ञानिकांची निवड करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदरील निविदेची कार्यवाही https://mahatenders.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध राहील.

ई-निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती https://chanda.nic.in व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ई-निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 29/06/2019 रोजी 5.45 वाजेपर्यंत आहे.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. 20/06/2019 | |
| ई-निविदा स्विकारण्याचा दिनांक | दि. 20/06/2019 ते दि. 29/06/2019 | वेळ संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत |
| प्री-बीड मिटींग | दि. 25/06/2019 | वेळ दुपारी 12.00 वाजता |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 01/07/2019 | वेळ दुपारी 3.00 वाजता |

दिनांक :- 20/06/2019

अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर

# जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

## चंद्रपूर जिल्ह्यातील गौण खनिजाच्या खाणपट्ट्यांचे लिलाव करण्यासंबंधाने भूवैज्ञानकीय तांत्रिक अहवाल तयार करण्याकरिता 3 (तिन) भूवैज्ञानिकांची नेमणुक करण्याकरिता ई-निविदा (दुसरी वेळ)

**वाचा :- 1. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013**

**2. महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र. : गौखनि-10/1118/प्र.क्र.448/ख, दिनांक 23/01/2019**

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 मधील नियम 9 मध्ये, शासनाकडे किंवा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमीनीवरील खाणपट्टे, तसेच खाजगी जमीनधारक किंवा भोगवटदार त्याची जमीन अन्य व्यक्तीस खाणकामासाठी देण्यास इच्छुक असेल आणि असा जमिनधारक किंवा किंवा भोगवटदार जिल्हधिकाऱ्यास या संबंधात लेखी संमतीपत्रक देत असेल तर अशा जमिनीवरील गौण खनिजाचे खाणपट्टे जाहिर लिलावाद्वारे मंजूर करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार चंद्रपूर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील खाणपट्टे मंजुर करण्याकरिता ई-लिलावाद्वारे खाणपट्टा धारकाची निवड करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे मार्फत निश्चित करण्यात आलेले शासकीय सर्व्हे नं. मधील क्षेत्र ई-लिलावाद्वारे गौण खनिज (मुरुम, माती, गिट्टी, बोल्डर इ.) उत्खनन व वाहतूकीसाठी 5 वर्षाच्या कालावधी करिता खाणपट्टे मंजुर करावयाचे आहेत. करिता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक 2 मधील मुद्दा क्रमांक (अ) अन्वये खाणकाम योग्य चिन्हांकीत क्षेत्राचा भूविज्ञानकीय तांत्रिक अहवाल तयार करण्याकरिता खनिज सवलत नियम, 2016 च्या तरतूदीनुसार अनुभवी अर्हताप्राप्त 3 (तिन) भूवैज्ञानिकांची ई-निविदेद्वारे निवड करण्याकरिता सदर जाहिरात देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. 20/06/2019 | |
| ई-निविदा स्विकारण्याचा दिनांक | दि. 20/06/2019 ते दि. 29/06/2019 | वेळ संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत |
| प्री-बीड मिटींग | दि. 25/06/2019 | वेळ दुपारी 12.00 वाजता |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 01/07/2019 | वेळ दुपारी 3.00 वाजता |

**चंद्रपूर जिल्ह्यातील गौण खनिजाच्या खाणपट्ट्यांचे लिलाव करण्यासंबंधाने भूवैज्ञानकीय तांत्रिक अहवाल तयार करण्याकरिता कामाचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.**

1. प्रस्तावित / चिन्हांकीत जागेचा Surface Plan तयार करणे (ETS द्वारे अचूक Reduceed Level घेणे )
2. Surface Geological Plan तयार करणे.
3. उपलब्ध विविध खडकांचे / गौण खनिजांचे विस्तृत भूशास्त्रीय माहिती तयार करणे
4. उपलब्ध गौण खनिजांचे भूस्तर निहाय (Statigraphic) वर्गिकरण करणे.
5. उपलब्ध गौण खनिजांचे रासायनिक पृथ:करण (Chemical Analysis) करणे तसेच आवश्यकतेनुसार खडकांचे Geo-Technical Investigation करणे.
6. गौण खनिज उपलब्धता (ब्रास मध्ये) अहवाल तयार करणे (Resource Estimation)
7. गौण खनिजांचे उपलब्धता तपासण्याकरिता आवश्यक Pitting & Trenching करुन भूशास्त्रीय माहिती घेणे.

8. उपरोक्त सर्व क्षेत्रिय माहितीसह भारतीय खाण ब्युरो (IBM) यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार तांत्रिक दृष्ट्या योग्य असलेला भूवैज्ञानकीय अहवाल तयार करणे. (तिन प्रती)
9. अहवालास संचालनालय, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून मान्यता घेणे तसेच गौण खनिज आढळ प्रमाणपत्र घेणे.

<u>**अटी व शर्ती :-**</u>

1. भूवैज्ञानिकाकडे पद्युत्तर पदवी (भूगर्भशास्त्र) व त्यापेक्षा उच्च अर्हता प्राप्त असल्यास प्राधान्य (M.Phil, Ph.D.) दिले जाईल.
2. कमीत कमी 5 वर्षाचा भूशास्त्रीय अहवाल, खाणकाम आराखडे तयार करण्याचा अनुभव असणे अनिवार्य राहील. त्याकरिता कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बंधकारक राहील.
3. निवडीचा कालावधी 5 वर्षाचा राहील.
4. ई-निविदा शुल्क रु. 1,000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.
5. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 आणि महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र. : गौखनि-10/1118/प्र.क्र.448/ख, दिनांक 23/01/2019 च्या तरतूदी लागू राहतील.
6. एका खाणकाम योग्य चिन्हांकीत क्षेत्राचा भूविज्ञानकीय तांत्रिक अहवाल तयार करण्याकरिता सर्वात कमी किंमत ई-निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र. 1, 2, 3 व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
7. निविदा मान्य झाल्यावर कोणतीही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.
8. भूविज्ञानकीय तांत्रिक अहवाल मा.संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय हे अथवा संचालनालयाने प्राधिकृत केलेला सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणीत करणे आणि संचालनालयाचे गौण खनिज आढळल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतर कंत्राटाची पूर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.
9. सदर कामाकरिता कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
10. निविदा मान्य झाल्यावर रु. 100/- च्या मुद्रांकनावर करारनामा करणे आवश्यक राहील.
11. अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास देय असलेली पूर्ण रक्कम कपात करण्यात येईल अथवा अंशत: कपात करुन रक्कम देण्यात येईल.
12. देय असलेल्या रक्कमेतुन नियमानुसार 2 % आयकर (TDS) कपात करण्यात येईल.
13. कुठलीही पूर्व सुचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना राहील.
14. अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना राहील.
15. सदर प्रकरणी काही वाद उद्भवल्यास चंद्रपूर न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडविण्यात येतील.
16. प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना राहील.
17. शासन धोरण, शासन निर्णय, परिपत्रक, अधिसूचना तसेच मा.न्यायालय व मा.हरीत लवाद वेळोवेळी यांचे होणारे आदेश / बदल मान्य करणे बंधनकारक राहील.
18. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक बाबी

अ. **तांत्रिक लिफाफा**

i) अट क्र. 1, 2 आणि 3 नुसार आवश्यक दस्तऐवज

ii) PAN Card

iii) कमीत कमी 5 वर्षे कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.

iv) सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र.

**ब. आर्थिक लिफाफा**

i) सदर दर BOQ मध्ये सादर करुन BOQ अपलोड करावा.

18/6/15

**अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर**